PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 6, ISSUE 4

# कोविड १९ - शिक्षण क्षेत्रासाठी संधी आणि समस्या

**डॉ. गणेशकुमार पेटकर**
सहयोगी प्राध्यापक
जनता महाविद्यालय चंद्रपूर
**(महाराष्ट्र) भारत**

## प्रस्तावना

२०२० ची सुरूवातच कोविड – १९ या विषाणू प्रसाराने झाली. चीनच्या वुहाण शहरातून सूरू झालेली ही साथ जगभर पसरली आणि ती आता वैश्विक महामारी ठरली. संपूर्ण जगभरात पसरलेल्या या महामारीने लाखो लोकांचे जीव गेले आणि सोबतच करोडो लोकांचे जीवन धोक्यात आले आहे. संपूर्ण जगातील अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्था उध्वस्त झाली आहे. घरातील चार जीव सुद्धा एकत्र बसण्यास, एकत्र येण्यास घाबरत आहे. मानव आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी सूद्धा आज कधी नव्हे इतका हतबल झाला आहे. संपूर्ण सामाजिक व्यवस्थे सोबतच कुटुंब व्यवस्था सुद्धा काही प्रमाणात का होईना विस्कळीत झाली आहे. चेहऱ्यावर मास्क लावणे, हात धुणे, सैनिटाइझरचा वापर, विशिष्ट अंतर ठेवून वागणे, चालणे–बोलणे, स्पर्श टाळणे यामुळे बऱ्याच सामाजिक समस्या निर्माण होत आहे.

शाळा, महाविद्यालये, शिक्षण क्षेत्राची गती मंदावली आहे. मुले घरी बसून कंटाळले आहेत. पालक सूद्धा शाळा सुरू होण्याची वाट बघत आहेत. तसेच शिक्षक सूद्धा विद्यार्थ्यांची उत्सुकतेने वाट बघत आहेत. विद्यार्थ्यांविना शाळा कशा विराण, ओसाड झाल्या आहेत. झाडांवर जसे पाखराची किलबिल नसेल तर तो वृक्ष उजाड वाटतो, तसेच शाळेत सूद्धा विद्यार्थ्यांची किलबिल नसेल तर शाळा सूद्धा ओसाड वाटतात. यावर्षी शाळेची घंटा वाजणारच नाही कि काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शाळेतील मुलांची, पालकांची व इतरांची वर्दळ थांबलेली आहे. काही प्रमाणात कुठे कुठे शाळेत फक्त शिक्षक वर्ग जात आहे. परंतु विद्यार्थीच नसल्यामुळे निव्वळ बसण्या व्यतिरिक्त काही फार महत्वाचे काम नाही.

अध्यापन आणि अध्ययन हे शिक्षण प्रक्रियेचे दोन महत्वाचे घटक आहेत. यापैकी एक जरी उपलब्ध नसेल तरी दुसरा घटक काहीच कामी येत नाही. शिक्षणाची प्रक्रिया ही द्वी–ध्रुविय आहे. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या आंतरक्रियेने समृद्ध झालेली ही अध्ययन – अध्यापनाची पद्धती आता द्विकेंद्रीत झाली आहे. एकीकडे शिक्षक आणि दुसरीकडे विद्यार्थी. शिक्षक घरून शिकवितात आणि विद्यार्थी घरी बसून शिकतात. अशा प्रकारे ऑनलाईन माध्यमाच्या रूपाने नविन शिक्षण प्रक्रियेला सुरूवात झालेली आहे. हे सर्व काही शिक्षकांसाठी किंवा शिक्षण प्रक्रियेसाठी नविन आहे असे म्हणता येणार नाही. परंतु आजची व्यापकता ही पूर्वी नव्हती असे म्हणता येतील. व्हिडीओ तसेच ऑडीओ कान्फरसिंगच्या माध्यमातून ही प्रक्रिया चालायची परंतु याचे स्वरूप चर्चासत्रे, परिसंवाद इत्यादी पूरतेच मर्यादित होते. काही वर्षापासून (Virtual Classroom) व्हर्च्युअल क्लासरूमला सुरूवात झालेली होतीच परंतु आज याचे महत्व मोठ्या प्रमाणावर वाढले आणि अधोरेखित झालेले आहे.

शिक्षण प्रक्रियेत माध्यमाचा वापर आता मोठ्या प्रमाणावर सुरू झाला आहे. शिक्षण म्हणजे गुरूने ज्ञान द्यावे आणि विद्यार्थ्यांने ते ग्रहण करावे ही संकल्पना नवनवीन माध्यमांच्या वापरामुळे मोडीत निघते की काय अशी सार्थ भीती वाटायला लागली आहे. पूर्वी वापरल्या जाणारी सर्व माध्यमे बाजूला पडून फक्त मोबाईल, इंटरनेट, संगणक, लॅपटॉप यांचाच आता वापर सुरू झालेला आहे. मोबाईल आणि इंटरनेटच्या माध्यमातून शिक्षणाची सुरू झालेली प्रक्रिया पाहता भावी पिढीचे शिक्षण कसे असेल याची कल्पना केली तरी शाळा महाविद्यालये नामशेष होऊन फक्त मुक्त शाळा आणि मुक्त विद्यापीठांची सुरूवात पुढे मोठ्या प्रमाणावर सुरू होते की काय असे वाटायला लागले आहे. यामध्ये शिक्षकी पेशा हा व्यावसायिक होऊन परंपरागत शिक्षण पद्धती कालबाह्य होते की काय असे वाटायला लागले. शिक्षकाचे महत्व संपणार नसले तरी शिक्षकांना नविन पिढीसाठी नव्याने बरेच काही शिकावे लागणार आहे. पारंपरिक शिक्षण पद्धतीचा वापर कमी करून ऑन लाईन शिक्षण माध्यमाद्वारे शिक्षण अशा पद्धतीचा अवलंब करावा लागणार आहे. या क्षेत्रात येणाऱ्या नविन तरूणांना या सर्व पद्धतीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. अध्यापन कौशल्यांमध्ये संगणकीय कौशल्य, ऑनलाईन शिक्षण कौशल्य या सर्वांचे ज्ञान असणे आवश्यक झाले आहे.

नविन पिढी ही बुद्धिमान तर आहेच तसेच ही पिढी मोबाईल, इंटरनेट या साधनांचा, माध्यमांचा फार मोठ्या प्रमाणावर वापर करीत असल्यामुळे यांना वरील कौशल्ये आत्मसात करण्यास वेळ लागणार नाही. परंतु प्रश्न येतो तो फक्त सद्या कार्यरत असणाऱ्या शिक्षकांचा. सद्या कार्यरत असणारा शिक्षक – प्राध्यापक वर्ग या सर्व माध्यमांचा एक तर वापर करितच नव्हता किंवा फार कमी प्रमाणात करत होता. आजही बऱ्याच शिक्षक – प्राध्यापकांना मोबाईलचा वापर सुद्धा व्यवस्थित

करता येत नाही याचे कारण भिन्न – भिन्न असू शकतात. परंतु आज हा सर्व वर्ग खडबडून जागा झाला आहे. मोबाईल मधील विविध ॲप्सचा वापर करून बघतो आहे. एरव्ही फेसबुक आणि व्हाट्सअॅप पुरते मर्यादित असलेले ज्ञान आता विस्तारित करीत आहे. मोबाईलच्या माध्यमातून विविध वेबिनार आणि कार्यशाळा पूर्ण करतो आहे. हा शिक्षण प्रक्रियेत घडून आलेला एक महत्वपूर्ण बदल आहे असे म्हणता येईल. पूर्वी मोबाईलला हात न लावणारा शिक्षक आज तासणतास मोबाईलवर वेबिनार मध्ये भाग घेतो आहे. गुगल क्लास च्या माध्यमातून वर्ग तयार करून बाकी इतर कामे करतो आहेत. याला कोविद –१९ मुळे शिक्षण क्षेत्रात घडुन आलेली क्रांती असे सुद्धा म्हणता येईल. आज शिक्षक मोबाईलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना धडे देतो आहे. कधी ऑनलाईन तर कधी व्हीडीओच्या माध्यमातुन घटक स्पष्ट करून सांगतो आहे. यु–ट्युब, व्हाट्सअॅप, झुम ॲप फेसबुक यांचा सर्वात जास्त वापर होतो आहे. ऑनलाईन माध्यमात युट्युब आणि फेसबुक चा वापर फार मोठ्या प्रमाणात होत आहे. शिक्षण क्षेत्रात आणि प्रक्रियेत झालेला हा बदल शिक्षकांनी आता हळुहळु का हांईना स्वीकारायला सुरूवात केली आहे.

शिक्षकांनी ऑनलाईन शिक्षण प्रक्रीया समजून ती राबविण्यास सुरूवात केलेली आहे खरी परंतु या प्रक्रियेसाठी आपला विद्यार्थी कितपत तयार आहे हे बघणे सुद्धा महत्वाचे आहे. बहुसंख्येने ग्रामीण भागात असणारा आमचा विद्यार्थी वर्ग या बदलाला कसा समोर जातो आहे हे पाहणे सुद्धा महत्वाचे आहे. साधणांची कमतरता, मोबाईल आहे तर वापर माहिती नाही, इंटरनेटची सुविधा नाही, असेलच तर कनेक्टीव्हीटी/नेटवर्क बरोबर नाही असे एक ना अनेक प्रश्न विद्यार्थ्यांसमोर तसेच शिक्षकांसमोर आहे आणि जर या माध्यमाद्वारेच पुढे काही दिवस शिक्षण द्यायचे असे ठरले तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे कसे होणार हा प्रश्न उपस्थित होतो आहे. शहरी भागातील विद्यार्थी याबाबतीत थोडा बरा आहे. जागृत पालक तसेच माध्यमांचा/मोबाईल, इंटरनेटचा वापर तो सर्रास करतो आहे. परंतु ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा विचार करता तो इथे मागे पडू शकतो. इथे असे म्हणायचे नाही की त्याला येणार नाही किंवा जमणार नाही परंतु मोबाईल आणि इंटरनेटची उपलब्धता यावर जर सारे काही अवलंबुन राहात असेल तर मात्र सुविधेअभावी हा विद्यार्थी शैक्षणिक दृष्ट्या मागे पडू शकतो.

ऑनलाईन शिक्षण ही आजची गरज असली तरी हा संपूर्ण शिक्षण प्रक्रियेला पर्याय होऊ शकत नाही, तसेच माध्यमांचा कितीही विकास झाला तरी कोणतेही माध्यम हे शिक्षकांची कमतरता पूर्ण करू शकणार नाही, शिक्षकांची जागा कधीही घेऊ शकणार नाही. प्रत्यक्ष शिक्षण आणि अप्रत्यक्ष शिक्षण या दोन बाबींमध्ये फार मोठी तफावत आहे. जिथे प्रत्यक्ष शिक्षणात भावनांचा मिलाप असतो तो अप्रत्यक्ष शिक्षणात नाही आणता येणार. ऑनलाईन शिक्षणाला वेळेचे येणारे बंधन

आणि आशयाला कवटाळून बसलेले शिक्षक यामुळे शिक्षणाची गोडी या प्रक्रियेतून निर्माण होणार नाही. सुरूवातीस ही प्रक्रिया कितीही सुंदर वाटली तरी कालांतराने तिचे फायद्या पेक्षा दुष्परीणाम जास्त असेल हे आजच दिसून येत आहे. तासनतास मोबाईल हातात देवुन मुलांना शिक्षण देता येणार नाही. मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने हे माध्यम फारसे उपयुक्त ठरणारे नसले तरी, याद्वारे विद्यार्थी बऱ्याचशा गोष्टी घरबसल्या शिकु शकतात. मैदानावर जाणवणारी मुलांची अनुपस्थिती यामुळे अजुन कमी होणार. कोविद – १९ मुळे सर्वांना घरात कोंडल्या सारखे झाले आहे. मुलांना शाळेची ओढ लागली आहे. त्यांना घरी बसुन मोबाईलवर शिकणे आता नकोसे वाटते. मध्ये एका पाहणीनुसार मुले शिक्षकाचे व्याख्यान सुरू करून नंतर ते इतर कामे करत असतात. म्हणजेच मुले ऑनलाईन तर उपस्थित आहे परंतु ते कुठेतरी इतर कामात गुंतले असतात किंवा खेळत असतात. अशा प्रकारे सुरू असलेल्या वर्गांना किती प्रतिसात मिळतो आणि विद्यार्थी किती शिकत असतात यावर प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे.

मुलांच्या हातात मोबाईल खूप जास्त वेळ दिल्यास त्याचे होणारे दुष्परिणाम याबद्दल आजच मानसशास्त्रज्ञ आणि डॉक्टर्स पालकांना तसेच शिक्षकांना सावध करीत आहेत. विविध वृत्तपत्रांच्या बातम्यामधून हे आपण वाचतोच आहे की मुलांवर मोबाईलच्या अतिवापराचा कसा परिणाम होत आहे.

तेव्हा यासाठी एका मध्यम मार्गाचा अवलंब करण्याची जास्त आवश्यकता आहे. जेणेकरून शिक्षण अधिक मनोरंजक तर होईलच शिवाय विद्यार्थी सुद्धा ते आवडीने शिकेल. याचा विचार करतांना सर्वच विषय ऑनलाईन पद्धतीने शिकविणे खरच गरजेचे आहे का? याचा सर्वप्रथम विचार व्हावा. तसेच विविध अभ्यासक्रमातील अनावश्यक भाग काढून टाकून जे जरूरी आहे ते शिकविणे तसेच पुढे चालून जे घटक विद्यार्थ्यांच्या खरोखरच कामी येणार आहेत अशाच घटकांवर भर देऊन तेच घटक ऑनलाईन पद्धतीने तसेच पुढे ऑफलाईन पद्धतीने शिकविण्यात यावे. तसे पाहता संपूर्ण अभ्यासक्रमाचेच पुन्हा मुल्यांकण होणे गरजेचे आहे. अभ्यासक्रमात सर्वच स्तरावर असे बरेच घटक आहेत की जे विद्यार्थ्यांना नाही शिकविले तरी काहीच हरकत नाही. विद्यार्थी पाठांतर करून असे घटक पूर्ण करीत असतात. खरेच असे घटक शिकविण्याची गरज आहे का? यावर अवश्य विचार व्हावा.

सद्य परिस्थितीत कोविद– १९ चा प्रकोप बघता विद्यार्थ्यांना सर्वच विषय न शिकविता काही ठराविक विषय जसे विज्ञान, भाषा, गणित अशा महत्वाच्या विषयावर भर दिला तरी चालेल तसेच यामध्ये सुद्धा यातील मुख्य घटकांवर भर देवून इतर घटक जे फारसे समोर उपयुक्त नाहीत त्यांना वगळले तरी काहीच हरकत नाही. खूप अभ्यासक्रम असला तर विद्यार्थ्यांना खूप माहिती

होतील असे काहीच नाही. जो घटक विद्यार्थ्यांना जीवनासाठी उपयुक्त आहे अशाच घटकांची वेगवेगळ्या विषयांतुन पुनर्रमांडणी व्हावी आणि या कोविद – १९ मुळे मिळालेल्या संधीच्या माध्यमातून संपूर्ण अभ्यासक्रमाची पुनर्ररचना व्हावी. जेणेकरून पुढे भविष्यात अशीच परिस्थिती उद्‌भवल्यास त्यास सामोरे जातांना त्रास होणार नाही. अभ्यासक्रम कमी असल्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षक दोघेही तो आनंदाने पूर्ण करतील. शिकविण्याचा आणि शिकण्याचा जास्त भार कमीत कमी प्राथमिक, उच्चप्राथमिक आणि माध्यमिक स्तरापर्यंत तरी नसावा याबद्दल कुणाचेही दुमत होणार नाही.

शिक्षणाची प्रक्रिया ऑनलाईन असो अथवा ऑफलाईन यामध्ये शिक्षकाचे महत्व कधीच कमी होणार नाही फक्त गरज आहे ते बदलांना सामोरे जाण्याची आपल्यात बदल करून घेण्याची ज्याला नवनवीन शिकण्याची आवड आहे त्याला हे काहीच कठीण वाटणार नाही, प्रश्न आहे तो फक्त याचा पद्धतशिर पणे राबविण्याचा, याचे कायदे आणि मर्यादा या तर जाणवतिलच परंतु येणाऱ्या सर्व समस्यांना समोरे जाण्यासाठी याचा प्रभावीपणे कसा वापर करता येईल हे पाहणे जास्त महत्वाचे आहे. नव्याचा विरोध करण्याची मानसिकता आता बदललेली आहे. तेव्हा नविन – जुणे यांचा ताळमेळ बसवित नविन घडामोडिंना सामोरे जाण्यातच शैक्षणिक क्षेत्राचे भले आहे. कारण येणारी पिढी आणि झपाट्याने सर्वच क्षेत्रात होणारे बदल यासाठी शिक्षण क्षेत्रांशी सुद्धा बदलले पाहिजेच. गरज आहे ती फक्त सकारात्मक दृष्टीकोणाची, योग्य नियोजणाची आणि ते बदल प्रभावीपणे राबविण्याची.

---

## संदर्भसूची :–


१. विविध वृत्तपत्रातील लेख

२. माध्यमावरील संदेश, चर्चा

३. वेबिनार मधिल चर्चा

४. पाटील, लीला (१९९८), “आजचे शिक्षण आजच्या समस्या” श्री विद्या प्रकाशन पुणे.

५. दांडेकर, वा. ना. (२०००), “शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र”